**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.१३/०८/२०२६

**"*श्रावणधारा" – पाऊस, कविता आणि सुरांची सदाबहार मैफल;* *महानगरपालिकेतर्फे विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन***

श्रावण महिन्याचे निसर्गरम्य वातावरण, पावसाच्या सरी आणि मराठी साहित्य-संगीताची अवीट गोडी यांचा सुरेल संगम अनुभवण्याची संधी वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील रसिक नागरिकांना मिळणार आहे, वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच", नवघर, डॉ. के. ब. हेडगेवार सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने आणि बिग कॅनव्हास एंटरटेनमेंट प्रस्तुत "श्रावणधारा" या पाऊस विषयावरील कविता व गाण्यांच्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दिनांक *१६ ऑगस्ट २०२६* रोजी *सायंकाळी ६.००* वाजता *वाय.एम.सी.ए. सभागृह, पार्वती क्रॉस, माणिकपूर क्रिकेट मैदानाजवळ, वसई (प.)* येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक धवल चांदवडकर आणि रसिका गानू चांदवडकर यांचा सहभाग असणार असून संगीतकार व गायक कौशल इनामदार तसेच कविवर्य अरुण म्हात्रे यांचा विशेष सहभाग हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. कविता आणि गीतांच्या माध्यमातून पावसाच्या विविध छटा रसिकांसमोर उलगडल्या जाणार असून, संगीत, शब्द आणि भावनांचा सुंदर मिलाफ या कार्यक्रमातून अनुभवता येणार आहे.

"श्रावणधारा" या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून वसई-विरार शहरातील सर्व नागरिक, साहित्यप्रेमी, संगीतप्रेमी आणि रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाऊस, कविता आणि सुरांनी सजलेल्या या अविस्मरणीय सास्कृतिक मैफलीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.